लोकमत

# ठाण्यात विद्यार्थ्यांचे सायबर वॉरियर पथक

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर, त्याचबरोबरीने सायबर गुन्ह्यांत होणारी वाढ लक्षात घेता, नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत ठाणे शहरात अनेक ठिकाणी पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेने जनजागृती अभियान सुरू केले आहे.

ठाण्यातील काही शाळांमध्ये शुक्रवारी आणि शनिवारी अशा फसवणुकीपासून सावधानता कशी बाळगावी, याविषयी गुन्हे शाखेने मार्गदर्शन केले. पोलिसांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांचे एक सायबर वॉरियर पथक सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती अभियान राबविणार आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. पंजाब उगले, उपायुक्त पराग मणेरे, सहायक पोलिस आयुक्त दत्तात्रय पाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध ठिकाणी जनजागृतीपर उपक्रम आयोजित केले जात आहेत.

## २०० विद्यार्थी सहभागी

- लहान मुलांपासून ते अगदी ज्येष्ठ नागरिकांना अशा फसवणूकीपासून सुरक्षित कसे राहता येईल, याची माहिती देण्यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.
- **शुक्रवारी सायबर गुन्हयांबाबत आयोजित कार्यशाळेत बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.**
- सायबर वॉरियर पथक शाळा, महाविद्यालयांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी सायबर गुन्ह्यांबाबत पथनाट्याद्वारे, तसेच व्याख्यानाच्या माध्यमातून जनजागृती करणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ऑनलाइनच्या माध्यमातून कोणत्याही अनोळखी व्यक्तींच्या बोलण्यावर विश्वास ठेवून अमिषाला किंवा भीतीलाही बळी पडू नका. आपल्यासोबत सायबर गुन्हा घडल्यास तत्काळ १९३० किंवा सायबर क्राइम जीओव्ही डॉट इन या शासनाच्या सायबर पोर्टलवर तक्रार करा.

**- आशुतोष डुंबरे,**
**पोलिस आयुक्त, ठाणे शहर**